# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः12.04.2024** **वारःशुक्रवार**

---

1. देशभरात लोकसभा निवडणुकीसाठी प्रचाराला वेग.
2. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याची अधिसूचना निवडणूक आयोगाकडून जारी.
3. उष्णतेच्या लाटेबाबतच्या उपाययोजनांचा पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत आढावा. आणि
4. भारत-म्यानमा सीमेवर कुंपण घालण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांचं प्रतिपादन

**<u>लोकसभा निवडणूक</u>**

लोकसभा निवडणुकीसाठी देशभरात प्रचाराला वेग आला आहे. पहिल्या टप्प्यात होणाऱ्या मतदानासाठी प्रशासकीय व्यवस्थाही करण्यात येत आहे. पंतप्रधान आणि भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांची राजस्थानातील बारमेर इथं प्रचारसभा होणार आहे. त्यानंतर ते दौसा इथं एका रोड शोमध्ये सहभागी होणार आहेत. राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या सुरतगड आणि हनुमानगड इथं सभा होणार आहेत. संरक्षणमंत्री राजनाथसिंह उत्तराखंडमधील गढवाल आणि कुमाऊं भागात सभा घेणार आहेत.

कॉंग्रेसचे राजस्थानचे प्रदेशाध्यक्ष गोविंद दोतासारा यांच्या अलवार आणि दौसा इथं सभा होणार आहेत. माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत आणि उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांच्याही कॉंग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा होणार आहेत.

लोकसभेसाठीची ही निवडणूक विकसित भारत मोहिमेला नवी ऊर्जा देईल, असं मोदी राजस्थानमधील करौली इथं काल झालेल्या सभेत म्हणाले. उत्तराखंडमध्ये ऋषिकेश इथं झालेल्या सभेत बोलताना त्यांनी सरकार कमकुवत असेल, तर त्याचा फायदा शत्रू घेतात असं स्पष्ट केलं. कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांची राजस्थानमधील अनुपगड इथं सभा झाली. बेरोजगारी आणि महागाई हे देशापुढचे दोन महत्त्वाचे मुद्दे आहेत, असं प्रतिपादन त्यांनी केलं.

महाराष्ट्रात नांदेड लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रचारासाठी केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी काल सभा घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारनं देशात आणि देशाच्या सीमेवर सुरक्षितता आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या असं ते म्हणाले.

बहुजन समाज पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा मायावती यांनी काल नागपुरातील बेजनबाग मैदानावर जाहीर सभा घेतली. यावेळी त्यांनी कॉंग्रेस आणि भाजपावर जोरदार हल्ला चढवला. बहुजन पक्षाच्या प्रत्येक उमेदवाराला जास्तीत जास्त मतांनी निवडून देण्याचं आवाहन मायावतींनी केलं.

**<u>अधिसूचना</u>**

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याची अधिसूचना निवडणूक आयोगानं जारी केली आहे. या टप्प्यात 10 राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधल्या 94 मतदार संघात मतदान होणार आहे. गुजरातमधील 26 जागा, कर्नाटकातील 14 जागा, छत्तीसगडमधील सात जागांवर मतदान होणार आहे. या टप्प्यात महाराष्ट्रातल्या रायगड, बारामती,

धाराशिव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या 11 लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. या मतदारसंघात आजपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होईल. 19 एप्रिल हा उमेदवारी अर्ज भरण्याचा अखेरचा दिवस आहे; आणि 20 एप्रिलला अर्जांची छाननी होईल. 22 एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येतील. आणि 7 मे रोजी मतदान होणार आहे. मध्य प्रदेशमधल्या बेतुल मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठीही आज अधिसूचना जारी करण्यात आली.

**जम्मू-काश्मीर सुरक्षा**

जम्मू-काश्मीरमध्ये पहिल्या टप्प्यात होणाऱ्या मतदानासाठी सुरक्षा व्यवस्था कडेकोट करण्यात आली आहे. किश्तवाड जिल्ह्यातील मारवा आणि वारवान भागांमध्ये केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाचे 144 जवान, तसंच जम्मू काश्मीरचे 44 पोलिस अधिकारी काल हवाईमार्गे दाखल झाले. हा भाग डोंगराळ असल्यामुळे तिथं सुरक्षा दलं तैनात करण्याचं आव्हान आहे. मतदानासाठीची साधनंही पोचवण्यासाठी जम्मू-काश्मीरच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी विशेष व्यवस्था केली आहे.

**उष्णता आढावा बैठक**

देशातील उष्णतेच्या लाटेबाबत व्यवस्थापनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आढावा घेण्यात आला. आगामी काळात विशेषतः देशाच्या मध्य आणि पश्चिम भागात उष्णतेची तीव्र लाट येण्याच्या हवामान विभागाच्या इशाऱ्याबाबत तयारीचा आढावा घेण्यात आला. आवश्यक औषधं, आईस पॅक्स, ओआरएस आणि पिण्यासाठीचं स्वच्छ पाणी यांचा पुरवठा सुरळीतपणे होणं आणि इतर उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. हवामानविषयक अंदाजांची माहिती स्थानिक भाषांमधून विविध माध्यमांमध्ये प्रसारित करण्यावर भर देण्यात आला. सरकारी यंत्रणांनी सर्वसमावेशक पद्धतीनं काम करावी अशी सूचना पंतप्रधानांनी केली. रुग्णालयांमधील तयारीवर भर द्यावा, तसंच जंगलातील वणव्यांबाबत तातडीनं उपाय योजावेत असंही त्यांनी स्पष्ट केलं. गृह सचिव, हवामान विभागाचे, तसंच आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

**म्यानमा जयशंकर**

भारत-म्यानमा सीमेवर कुंपण घालण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. भारतीय जनता पक्षाचा मिझोरामसाठीचा जाहीरनामा काल जयशंकर यांच्या हस्ते प्रसिद्ध करण्यात आला. त्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते. मिझोराममधल्या जनतेनं परिस्थिती समजून घ्यावी, असं आवाहन जयशंकर यांनी केलं. म्यानमा शांततेसाठी प्रयत्न करत असेल, किंवा त्या देशातील यादवी युद्ध संपलं तर कुंपणाची गरजच भासणार नाही, असंही त्यांनी नमूद केलं. म्यानमामधून भारतात होत असलेली अमली पदार्थांची तस्करी हा भारतासाठी मोठा चिंतेचा विषय आहे असं ते म्हणाले.

**ब्रिटन उच्चायुक्त**

ब्रिटननं लिंडी कॅमेरॉन यांची भारतातील उच्चायुक्त म्हणून नेमणूक केली आहे. सध्याचे उच्चायुक्त अलेक्स एलिस यांची राजनैतिक सेवेतील इतर विभागामध्ये बदली झाली आहे. कॅमेरॉन या ब्रिटननं भारतात नियुक्त केलेल्या पहिल्याच महिला उच्चायुक्त आहेत.

**त्रिशक्ती चाचणी**

लष्कराच्या त्रिशक्ती विभागातल्या जवानांनी काल सिक्कीममध्ये समुद्रसपाटीपासून 17 हजार उंचीवर रणगाडाविरोधी क्षेपणास्त्राची चाचणी घेतली. इतरही प्रशिक्षण सराव करण्यात आले, असं गुवाहाटीच्या संरक्षण दलाच्या प्रवक्त्यानं सांगितलं आहे. ही क्षेपणास्त्रं उंचावरून प्रभावी रितीनं चालू शकतात का, हे चाचणीमुळं सिद्ध झाल्याचं संरक्षण दलानं स्पष्ट केलं आहे.

**नेपाळ राजदूत**

नेपाळचे भारतातील राजदूत शंकरप्रसाद शर्मा यांनी भारतातील उद्योजकांनी नेपाळमध्ये गुंतवणूक करावी, असं आवाहन केलं. नवी दिल्लीत उद्योजक मेळाव्यात ते बोलत होते. नेपाळमध्ये भारताची सर्वांत जास्त गुंतवणूक आहे, असं

सांगून ते म्हणाले, की नेपाळमधील एकूण गुंतवणुकीपैकी एक तृतियांश गुंतवणूक एकट्या भारतातून होत आहे. भारतीय उद्योजकांनी नेपाळमध्ये जलविद्युत विभागात गुंतवणूक करावी, असंही शर्मा यांनी सुचवलं. काठमांडूमध्ये या महिन्यात 28 आणि 29 तारखेला नेपाळ गुंतवणूक शिखर परिषद आयोजित करण्यात आली आहे.

**बॅडमिंटन**

बॅडमिंटनच्या आशिया चॅम्पियनशिप स्पर्धेत चीनच्या निंगबो इथं पी व्ही सिंधू ला महिला एकेरीच्या उप उपांत्यपूर्व फेरीत चीनच्या शटलर हान यु हिच्याविरुद्ध पराभव पत्करावा लागला. पुरुष एकेरीत एच एस प्रणोय देखील तैवान च्या लीन चुन यी विरुद्ध खेळताना पराभवी झाला आहे. महिला दुहेरीत जपान च्या नामी मात्सुयामा आणि चीहारू शिदा या जोडीने भारताच्या अश्विनी पोनप्पा आणि तनिशा कस्ट्रो जोडीचा 21-17, 21-12 असा पराभव केला.

**टेनिस**

चीनमधल्या चांगशा येथील मून आयलंड क्ले पार्क इथं सुरू असलेल्या तिसऱ्या बिली जीन किंग चषक 2024 आशिया गट एकच्या लढतीत भारतीय महिला टेनिस संघानं तैपेईचा 2-1 असा पराभव केला. जागतिक क्रमवारीत 379 व्या स्थानावर असलेल्या ऋतुजा भोसलेने हाओ-चिंग चांगचा 6-3, 6-2 असा पराभव करून भारताला विजयी सुरुवात करून दिली. डब्ल्यूटीए एकेरीच्या जागतिक क्रमवारीत भारताची सर्वोत्तम मानांकित टेनिसपटू अंकिता रैनानेही जागतिक क्रमवारीत 289 व्या स्थानावर असलेल्या तैपेईच्या अव्वल एकेरी कार्ड असलेल्या एन शुओ लियांगविरुद्ध आपल्या सामन्याची चांगली सुरुवात केली.या विजयामुळे भारताने तीन सामन्यांपैकी दोन विजयांसह आशिया गट एकच्या गुणतालिकेत तिसरं स्थान पटकावलं आहे. पात्रता फेरीत प्रवेश मिळवण्यासाठी भारताला पहिल्या दोन मध्ये स्थान मिळवणे आवश्यक आहे. बिली जीन किंग चषक 2024मध्ये भारतीय महिला टेनिस संघाचा सामना आता गुणतालिकेत अव्वल स्थानी असलेल्या दक्षिण कोरियाशी होणार आहे.

**कुस्ती अजिंक्यपद**

आशिया चषक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारताला तीन पदकं मिळाली आहेत. किरगिझीस्तानमधील बिश्केक इथं ही स्पर्धा सुरू आहे. पुरुषांच्या 57 किलो वजनी गटात उदित याला रौप्यपदक मिळालं, तर 70 आणि 97 किलो गटांमध्ये अभिमन्यू आणि व्हिकी यांनी कास्यपदक मिळवलं. उदितला जपानच्या केंटो युमियाकडून चार-पाच अशा गुणांनी पराभव पत्करावा लागला. आज आकाश दहिया, संदीप मान आणि अनिरुद्ध कुमार यांच्या विविध विभागांमध्ये कुस्ती होणार आहेत.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यासह मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये सोसाट्याच्या वाऱ्यांसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागानं वर्तवला आहे. रविवारपर्यंत जम्मू, काश्मीर, लडाखमध्ये, तर रविवारी हिमाचल प्रदेशात मुसळधार पावसाचा अंदाजही हवामान खात्यानं वर्तवला आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**